**मंत्रालय येथे नियुक्त करण्यात आलेल्या एलिट गार्ड कंपनी मधील अंमलदार यांचेकरीता व त्यांचे जवळील शस्त्रसामुग्री सुरक्षित ठेवणेकरिता जागा वाटप करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्र.शाकाजा-११२६/प्र.क्र.८/२०२६/निवास-१,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १३ एप्रिल, २०२६

**प्रस्तावना :**

मंत्रालय येथे नियुक्त करण्यात आलेल्या एलिट गार्ड कंपनी मधील अंमलदार यांचेकरीता व त्यांचे जवळील शस्त्रसामुग्री सुरक्षित ठेवणेकरिता मंत्रालय विस्तारीत इमारतीत तळ मजल्यावर जागा वाटप करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय :**

मंत्रालय इमारतीस लागलेल्या आग दुर्घटनेनंतर गॅरेज क्र. ६३ व ६४ चा ताबा अग्निशमन दलाच्या कार्यालयासाठी देण्यात आला आहे. सदर गॅरेज क्र.६३ व ६४ येथील एकूण ४६३.११ चौ.फुट जागेची विभागणी करुन २०० चौ.फुट जागा अग्निशमन दलाच्या कार्यालयासाठी व २६३.११ चौ.फुट जागा मंत्रालय येथे नियुक्त करण्यात आलेल्या एलिट गार्ड कंपनी मधील अंमलदार यांचेकरीता व त्यांचे जवळील शस्त्रसामुग्री सुरक्षित ठेवणेकरिता वाटप करण्यात येत आहे.

२. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांनी उपरोक्त जागेचा ताबा संबंधितांना दयावा व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४१३१२४६२५७००७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DEVIDAS SANDUJI BHAGURE

Digitally signed by DEVIDAS SANDUJI BHAGURE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=0990ae5e49835c85a735703503a82e3cd3cdde019c8ce2fdb9c7765ef1b7c39f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2D19FEFD30011466572B4E69158C3099ADDED4CBB59D6833F72ED93F73A564DC, cn=DEVIDAS SANDUJI BHAGURE
Date: 2026.04.13 12:47:23 +05'30'

**( दे.सां.भगुरे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) पोलीस उप आयुक्त, मंत्रालय सुरक्षा, मुंबई.
२) कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, २ रा मजला, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-०१.
३) उप अभियंता, दक्षिण उपविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, एम.टी.डी.सी. समोर, मुंबई.
४) शाखा अभियंता, मंत्रालय शाखा (स्थापत्य), सा.बां. मंत्रालय आवार, मंत्रालय, मुंबई-३२
५) निवडनस्ती.